The Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act 2005

Ministry of Rural Development
Government of India

# जाहिरात

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र MGNREGS चंद्रपूर

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सेतू मार्फत खालीलप्रमाणे पदाकरीता पात्र उमेदवाराकडून **ऑनलाईन पध्दतीने** अर्ज मागविण्यात येतआहे. सदर पदे ही पूर्णत: कंत्राटी स्वरुपाची असून निश्चित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची आहेत.

| | |
|---|---|
| ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची तारीख | 27/02/2018 |
| ऑनलाईन अर्ज भरण्याची शेवटची तारीख | 08/03/2018 |
| बँकेत चालान भरण्याची शेवटची तारीख | 09/03/2018 |
| परीक्षेचे प्रवेशपत्र व परीक्षा | नंतर वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. |
| हेल्पलाईन क्रमांक | 1. 02267077000, 022-61316403, 07172250001<br>2. www.mahaonline.gov.in https://maharecruitment.mahaonline.gov.in |

**पदाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ. क्र. | पदाचे नाव | पदाची संख्या | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| 1 | तांत्रिक सहायक (सिव्हील) | 9 | सिव्हील इंजिनिअरींग डिप्लोमा/सिव्हील इंजिनिअरींग पदवी | एकत्रित मानधन दरमहा 14000/- |
| 2 | लेखापाल | 4 | मान्यता प्राप्त विद्यापिठाची वाणिज्य शाखेची पदवी | एकत्रित मानधन दरमहा 10800/- |
| 3 | क्लर्क कम डाटा एन्ट्री ऑपरेटर | 2 | H. S. C. पास, टायपिंग इंग्रजी 40 व मराठी टायपिंग 30, MS-CIT उत्तीर्ण | एकत्रित मानधन दरमहा 8056/- |

### पात्रतेविषयी अटी :-

1. उमेदवाराचे वय 25/02/2018 या अर्हता दिनांकावर 35 वर्षापेक्षा जास्त नसावे व संबंधीत पदाची शैक्षणीक अर्हता उमेदवाराने धारण केलेली असावी. सर्व पदांसाठी कोणत्याही प्रकारचे आरक्षण नाही.
2. उमेदवाराची निवड लेखी परीक्षेच्या आधारे करण्यात येईल. लेखी परीक्षा ही ऑनलाईन पध्दतीने (Computer Based Test) घेण्यात येईल.
3. लेखी परीक्षा ही 50 प्रश्नांची असेल. प्रत्येक प्रश्नाला 2 गुण असे एकुण 100 गुण असतील. त्यामध्ये 10 प्रश्न - सामान्यज्ञान, 10 प्रश्न - गणित व बुध्दीमत्ता, 5 प्रश्न - इंग्रजी व 25 प्रश्न - संबंधित पदाच्या शैक्षणीक अर्हतेवर आधारीत राहील.
4. परीक्षा शुल्क वरील सर्व पदांकरीता रु. 500 (नापरतावा) इतके राहील. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी त्यांचे परीक्षा शुल्क कार्यालयाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर दिलेल्या सूचनेनुसार भरण्यात यावे. उमेदवाराने परिक्षाशुल्क Net Banking/Debit Card/Credit Card द्वारे किंवा बँक चालान द्वारे चालान प्रत देऊन SBI बँकेच्या कोणत्याही शाखेत कार्यालयीन वेळेत भरण्यात यावे तसेच शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणाऱ्या उमेदवाराने त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. त्यानंतर शुल्क भरता येणार नाही.

**अर्ज करण्याची पध्दत :-**

1. अर्ज सादर करतांना दिलेल्या Website https://maharecruitment.mahaonline.gov.in वरील सूचनांचे काटेकोर पालन करुन अर्ज सादर करावा. तसेच उमेदवाराने वेळोवेळी संकेतस्थळाचे अवलोकन करणे आवश्यक आहे. कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
2. प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त Online पध्दतीने स्विकारण्यात येईल इतर कोणत्याही पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येणार नाही.
3. पात्र उमेदवाराला ऑनलाईन अर्ज https://maharecruitment.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे दिनांक 08/03/ 2018 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील.
4. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करतांना उमेदवाराने स्वत:चा अद्यावत फोटो (3.5 सेमी X 4.5 सेमी) व स्वत:ची स्वाक्षरी (रुंदी 3 सेमी X 2.5) आणि 300 DP Resolution आणि 50 KB पेक्षा कमी साईज होईल अशा विहित पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे. (टिप – फोटो व स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवाराने त्याचाच फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याचे खात्री करावी. प्रवेश पत्रावर / अर्जावर दुसऱ्याचा फोटो / स्वाक्षरी असल्यास उमेदवारास निवडीच्या टप्प्यामध्ये प्रवेश दिल्या जाणार नाही.)
5. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना **https://maharecruitment.mahaonline.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
6. अर्ज ऑनलाईन अथवा आपले सरकार केंद्राद्वारे भरता येते. महाराष्ट्र शासनाचे प्रत्येक जिल्हयात आपले सरकार सेवा केंद्र उघडण्यात आले आहे. सेवा केंद्राची यादी https://maharecruitment.mahaonline.gov.in किंवा www.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
7. उमेदवाराने यापूर्वी https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर आपले खाते तयार केलेले नसल्यास उमेदवारास नवीन वापरकर्ता नोंदणीवर क्लिक करुन Username व Password तयार करावा लागेल.
8. त्यानंतर उमेदवारास प्रोफाईल निर्मितीमध्ये जाऊन स्वत:ची सर्व माहिती भरावी लागेल. https://maharecruitment.mahaonline.gov.in या वेबसाईट वर यापूर्वी प्रोफाईल मधील निर्मिती मध्ये जाऊन स्वत:ची संपूर्ण माहिती भरलेली असल्यास पुन्हा माहिती भरण्याची आवश्यकता नाही. उमेदवार स्वत:ची प्रोफाईल मधील माहिती कधीही अद्यावत करु शकतो.
9. उमेदवाराने युजर नेम व पासवर्ड ची नोंद लॉग इन केल्यानंतर अर्ज सादर करावयाचा कार्यालयाच्या लिंकवर क्लिक करावे. त्या कार्यालया अंतर्गत उपलब्ध जाहिरातीत अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा या संदेशासही दाखविला जातील.
10. क्लिक केल्यानंतर आपण जाहिरातीत नमूद शैक्षणिक पात्रता/अनुभव/इतर बाबींची पूर्तता करीत असल्यास आपले अर्ज स्विकारल्या जातील अन्यथा अर्ज दाखल न होण्याचे कारण दाखविले जातील.
11. परीक्षा प्रवेशपत्र उमेदवारास https://maharecruitment.mahaonline.gov.in या वेबसाईट वर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. पदभरती संदर्भात सविस्तर माहिती, इतर शर्ती व अटी या https://maharecruitment.mahaonline.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली संपूर्ण जाहिरातीमधील सूचनाने वाचन करुनच अर्ज सादर करावा.
12. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना :-**

1. उमेदवार हा महाराष्ट्रातील मूळ रहिवासी असावा. उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
2. प्रस्तुत भरती प्रक्रियेच्या वेळोवेळी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.तसेच सदरहु प्रक्रियेत काही बाबी नमूद करावयाच्या राहील्यास किंवा अनावधनाने चुकीच्या नमूद केलेल्या असल्यास त्या प्रचलित शासन निर्देशानुसार/ निर्णयानुसार लागू राहील.
3. अर्ज भरण्यासंबंधी हॉल तिकीट (परीक्षा प्रवेशपत्र) उपलब्धतेसाठी इत्यादी तत्सम बाबींसाठी वरील संकेतस्थळावर संपर्क करावा. स्वतंत्र पत्रव्यवहार किंवा कळविले जाणार नाही.
4. निवड झालेल्या उमेदवारांना पदस्थापना पंचायत समिती स्तरावर देण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांनी पदस्थापनेबाबत/स्थळाबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेबाबत विनंती केल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.
5. वेगवेगळया पदासाठी वेगवेगळा अर्ज करावा लागेल.परंतु एकाच वेळेस वेगवेगळया पदाची परीक्षा आली तर एकाच पदाच्या परीक्षेसाठी उमेदवाराला स्वेच्छेने बसता येईल.
6. उमेदवाराने यापूर्वी जरी त्याचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालयाकडे येथे नोंदविले असेल तरी त्यांना या पदाच्या भरतीसाठी ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.)
7. एखादया उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष,अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.
8. उमेदवाराची निवड लिखीत परीक्षेच्या गुणाच्या आधारे गुणानुक्रमे तयार केलेल्या यादीनुसार करण्यात येईल. समानु गुण धारण करणाऱ्या उमेदवाराच्या निवडीबाबत शासन निर्णय दि. 5/10/2015 मध्ये दिलेल्या सूचनांच्या अधीन राहून निवड केल्या जाईल.
9. कोणत्याही कारणास्तवर रिक्त पदाच्या संख्येत बदल अथवा भरती रद्द झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदाची संख्या, परीक्षा स्थगीत करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मगांराग्रारोहयो) यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.
10. भरती प्रक्रियेसंबंधी देण्यात आलेल्या सुधारीत व अद्यावत सूचना www.chanda.nic.in तसेच https://maharecruitment.mahaonline.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.
11. उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता, पात्रता इत्यादी तपासून अर्ज करावा.
12. कोणताही अर्ज करणारा उमेदवार विहित शैक्षणिक अर्हता, पात्रता धारण करीत नसल्याचे किंवा त्यांचे चारित्र्य किंवा पूर्व चारित्र्य बरोबर नसल्याचे आढळल्यास त्यांची उमेदवारी नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.
13. उमेदवारांनी जाहितीमध्ये नमूद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार पात्र असे समजून संगणक प्रणालीवर ऑनलाईन (CBT) परीक्षेकरीता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल. परीक्षेचा कोणताही येण्याजाण्याचा खर्च दिला जाणार नाही. नियुक्तीपूर्वी उमेदवाराची जाहिरातीनुसार पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळी उमेदवार अपात्र आढळल्यास नियुक्ती करण्यात येणार नाही यावी सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील .
14. अधिक माहितीसाठी व सूचनांसाठी https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर भेट दयावी.

fa जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक
(मगांराग्रारोहयो), चंद्रपूर